# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.01.2026** **वारःरविवार**

---

•पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सोमनाथ स्वाभिमान पर्वामध्ये सहभागी होणार.
•२०२६-२७च्या केंद्रीय अर्थसंकल्पासंदर्भात केंद्रीय अर्थमंत्र्यांची विविध राज्यांच्या अर्थमंत्र्यांशी चर्चा
•भारतीय टपाल विभागाच्या 'स्पीड पोस्ट २४' आणि 'स्पीड पोस्ट ४८' या दोन नवीन सेवांची घोषणा.
आणि
पुरुषांच्या क्रिकेट संघाच्या नव्या वर्षातील हंगामाला न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेने आजपासून सुरुवात.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर असून आज ते ऐतिहासिक 'सोमनाथ स्वाभिमान पर्वामध्ये सहभागी होणार आहेत. 1026 मध्ये सोमनाथ मंदिरावर झालेल्या आक्रमणाला एक हजार वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त तसंच मंदिराच्या पुनर्बांधणीला 75 वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मंदिराचं रक्षण करणाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी आयोजित 'शौर्य यात्रे' मध्येही पंतप्रधान सहभागी होणार आहेत. सोमनाथमध्ये एका सार्वजनिक सभेला संबोधित केल्यानंतर पंतप्रधान आज राजकोटमध्ये व्हायब्रंट गुजरात प्रादेशिक परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. तत्पूर्वी, काल संध्याकाळी सोमनाथला पोहोचल्यानंतर पंतप्रधानांनी 'ओमकार मंत्र' जपामध्ये भाग घेतला आणि मंदिरात ड्रोन शोची पाहणी केली. या ऐतिहासिक उत्सवात देशभरातील भाविक मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत.

**<u>अमितशहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा केरळच्या एक दिवसाच्या दौऱ्यासाठी काल रात्री तिरुअनंतपुरमला पोहोचले. तिरुअनंतपुरम महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर व्ही. व्ही. राजेश, केरळ भाजप अध्यक्ष राजीव चंद्रशेखर आणि पक्षाच्या इतर वरिष्ठ नेत्यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयी झालेल्या भाजप प्रतिनिधींची बैठक शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे. गृहमंत्री आज सकाळी श्री पद्मनाभस्वामी मंदिरात दर्शन घेणार असून दुपारी केरळ कौमुदी कॉन्क्लेव्हमध्येही सहभागी होतील.

**<u>अर्थसंकल्पपूर्वबैठक</u>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या राज्यपाल, मुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्यासमवेत  अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. यावेळी २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत काही मुद्दे मांडण्यात आले; त्याची योग्य ती दखल घेतली जाईल असं आश्वासन सीतारामन यांनी यावेळी दिलं. यामध्ये भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अधिक निधीसह सुरू ठेवण्याची मागणीदेखील करण्यात आली आहे. २०२०-२१ पासून, सरकारने या योजने अंतर्गत राज्यांना ५० वर्षांसाठी व्याजमुक्त कर्ज म्हणून ४ लाख २५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम दिली आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन या महिन्याच्या २८ तारखेपासून सुरू होणार आहे.

**सिंधिया**

केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी भारतीय टपाल विभागाच्या 'स्पीड पोस्ट २४' आणि 'स्पीड पोस्ट ४८' या दोन नवीन सेवांची घोषणा केली आहे, या सेवांच्या माध्यमातून २४ आणि ४८ तासांत टपाल सेवा दिली जाणार आहे. मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील पिचोर इथं त्यांनी एका कार्यक्रमात ही घोषणा केली. या दोन सेवांमुळे  विश्वासार्ह आणि जलद वितरणाचा एक नवीन मापदंड स्थापित केला जाईल असं सिंधिया यांनी यावेळी सांगितलं.

**विकसित**

देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची असते, असं प्रतिपादन युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं. विकसित भारत युवा नेता संवाद 2026 परिषदेचं उद्घाटन मांडवीय यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत झालं, त्यावेळी ते बोलत होते. तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, शाश्वत पर्याय आणि सामाजिक विकास अशा क्षेत्रांमध्ये विविध उपाय सुचवण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन मिळावं, हे या संवादामागचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय यांनी सांगितलं. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनीही यावेळी मार्गदर्शन केलं. भारतापुढे केवळ देशाच्या सीमा संरक्षित ठेवण्याचंच आव्हान नाही, तर आर्थिक आघाडीवरही देशाला सज्ज राहावं लागतं, असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं.

**पुस्तक**

नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं नवी दिल्ली जागतिक पुस्तक प्रदर्शनाच्या ५३व्या पर्वाला सुरुवात झाली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आलं. 'भारतीय लष्करी इतिहास: शौर्य आणि ज्ञान @ ७५' अशी या प्रदर्शनाची संकल्पना आहे. येत्या १८ तारखेपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

**महाराष्ट्रनिवडणूक**

महाराष्ट्रात 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचार संपण्यासाठी केवळ तीनच दिवस राहिले असून विविध पक्षांनी प्रचारात जोर लावला आहे. जाहीर  सभा, रोड शो, तसंच समाज माध्यमांवरदेखील प्रचाराला रंग चढला आहे. 15 जानेवारीला मतदान होणार असून लगेचच दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**संरासुबैठक**

रशियाने यूक्रेनवर नुकत्याच केलेल्या हल्ल्यांनंतर दोन्ही देशांमधील संघर्षाबाबत  संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची एक आपत्कालीन बैठक उद्या होणार आहे. युक्रेनचे परराष्ट्र मंत्री आंद्री सिबिहा यांनी ही माहिती दिली आहे. या हल्ल्यांमध्ये मध्यम-पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला होता. हे हल्ले त्वरित थांबवावेत, तसंच यूक्रेनमधील नागरिकांचं संरक्षण, युक्रेनचं सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेसाठी पाठिंबा देण्याचं आवाहन आंद्री सिबिहा यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला केलं आहे. तर दोन्ही देशांमधील तणाव वाढवण्यासाठी युरोप जवाबदार असल्याचा आरोप रशियानं केला आहे.

दरम्यान रशियाने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून काल युक्रेननं रशियाच्या दक्षिणेकडील वोरोनेझ शहरावर ड्रोन हल्ले केले. यात किमान चार लोक जखमी झाले आणि अनेक इमारतींचे नुकसान झालं आहे.

**इराण**

इराणमध्ये सरकारविरोधी निदर्शने तीव्र झाली आहेत. इराणमधील या अशांत परिस्थितीला दहशतवादीच जवाबदार असल्याचं इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड्सने म्हटलं आहे. इराणमध्ये सध्या इंटरनेट बंद असून तिथल्या सध्याच्या परिस्थितीबाबत माहिती मिळणं अवघड होत आहे. तेहरानसह रश्त, तब्रीझ, शिराझ, केरमानमध्ये महागाईच्या विरोधात सुरू झालेल्या या आंदोलनांने राजकीय स्वरूप घेतलं आहे. किमान ५० आंदोलक तर १५ सुरक्षा कर्मचारी यामध्ये ठार झाले असून २ हजार ३ शे जणांना अटक झाल्याचे एचआरएएनएने सांगितलं. २८ डिसेंबरपासून संपूर्ण इराणमध्ये सत्ताधाऱ्याविरोधात निदर्शनं सुरू आहेत.

**सुटका**

नोकरीच्या खोट्या आश्वासनांनी म्यानमामध्ये फसवून नेलेल्या, आणि सायबर फसवणूक कारवायांमध्ये अवैधपणे काम करण्यास भाग पाडलेल्या एकंदर २७ भारतीय नागरिकांना सोडवून त्यांना भारतात परत आणण्यात आलं आहे. या नागरिकांची  म्यानमाच्या सीमेवर तस्करी करण्यात येवून त्यांचा शारीरिक छळ करण्यात आला तसेच त्यांना सायबर फसवणुकीची कामे करण्यासाठी भाग पाडण्यात आलं.

**Upsc**

यु पी एस सी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निवड परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी प्रत्यक्ष चेहरा पडताळणीला सामोरं जावं लागणार आहे. २०२५ दरम्यान झालेल्या एन डी ए च्या, नेव्हल अकॅडेमि च्या आणि सी डी एस च्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचीही आयोगानं चेहरा पडताळणी केली होती. या पडताळणी दरम्यान विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जासोबत जोडलेलं त्यांचं छायाचित्र आणि त्यांच्या प्रत्यक्ष चेहऱ्याची यांत्रिक पद्धतीनं शहानिशा केली जाते.

**मांडवीय-**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी, ब्राझीलचे माजी फुटबॉलपटू गिल्बर्टो डी'सिल्वा यांच्यासमवेत, काल फिफा विश्वचषक २०२६ च्या चषकाचे अनावरण केले. हा चषक तीन दिवस भारतात राहणार आहे. फुटबॉल चाहत्यांना हा चषक जवळून पाहण्याची एक दुर्मिळ संधी मिळाली आहे.

**विमानदुर्घटना**

ओडिशातील विमान दुर्घटनेची चौकशी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोद्वारा करण्यात येईल, असं नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं म्हटलं आहे. इंडियावन एअर सेस्ना ग्रँड सी २०८ बी विमान काल दुपारी भुवनेश्वरहून निघाल्यानंतर काही वेळातच तांत्रिक दोषामुळं काल दुपारी कानसोरजवळील एका मोकळ्या जागेत उतरवण्यात आलं होतं. ही जागा राउरकेला विमानतळापासून सुमारे १५ ते २० किमी अंतरावर आहे. विमानातील सर्वजण अर्थात चार प्रवासी आणि दोन कर्मचारी, सुरक्षित असून त्यांना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

**खेलो**

दीवमध्ये खेलो इंडिया बीच स्पर्धेची काल सांगता झाली. स्पर्धेत सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या 77 जणांच्या पथकानं 3 रौप्य आणि 5 कास्य पदकांची कमाई केली.

**मआयपीएल**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, काल मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव केला. १९६ धावांचा पाठलाग करताना  दिल्ली कॅपिटल्सला १४५ धावा करता आल्या.  दिल्ली कॅपिटल्सकडून चिनले हेन्रीने सर्वाधिक ५६ धावा केल्या. मुंबई इंडियन्सकडून निकोला केरी आणि अमेलिया केर यांनी प्रत्येकी तीन तर नॅट सायव्हर-ब्रंटने दोन बळी घेतले. तत्पूर्वी मुंबई इंडियन्सकडून कर्णधार हरमनप्रीत कौरने नाबाद ७५ धावा आणि नॅट सायव्हर-ब्रंटने ७० धावांचे योगदान दिले. हरमनप्रीत कौरला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. आज, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमीमध्ये सामना होणार आहे.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघ आजपासून आपल्या २०२६ हंगामाची सुरुवात करत आहे. आज वडोदरा इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना होत आहे. हा सामना दुपारी दीड वाजता सुरू होईल. रोहित शर्मा आणि विराट कोहली संघाचा भाग असून यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे. मालिकेतील दुसरा सामना १४ जानेवारी रोजी राजकोट तर तिसरा आणि अंतिम सामना १८ जानेवारी रोजी इंदूर इथं होणार आहे.

**या बरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.**